**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना भारतात मात्र अभूतपूर्व स्थैर्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- या आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट, स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यापर्यंत रोखणं शक्य असल्याचा पीडब्ल्यूसीचा अहवाल

- महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला, मुंबई महापालिकेसाठी महायुतीचा, तर नागपूरसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडचं भारतापुढं विजयासाठी ३०१ धावांचं आव्हान

**<><><><><>**

जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना भारतात मात्र अभूतपूर्व स्थैर्य असून विकसित राष्ट्र होण्याकडे भारताची वेगवान वाटचाल सुरू असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते राजकोट इथे, कच्छ आणि सौराष्ट्र प्रदेशासाठीच्या व्हायब्रंट गुजरात प्रादेशिक परिषदेत बोलत होते. कच्छ आणि सौराष्ट्रमधे गुंतवणूक करण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी गुंतवणूकदारांना केलं.

याप्रसंगी प्रधानमंत्र्यांनी १३ ग्रीनफील्ड स्मार्ट औद्योगिक वसाहतींचं दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केलं. यावेळी उद्योगपती मुकेश अंबानी, करण अदानी, बी के गोएंका उपस्थित होते. त्याआधी प्रधानमंत्र्यांनी राजकोट इथे, व्हायब्रंट गुजरात व्यापार प्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

**ते आज दुपारी** सोमनाथ इथे सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले. सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पूर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. आपल्या पूर्वजांनी प्राणाचं बलिदान देऊन सोमनाथ मंदिराचं रक्षण केलं, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

त्याआधी सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा भाग म्हणून भव्य शौर्ययात्रा निघाली. गुजरातच्या विविध भागातून आलेले १०८ अश्व आणि डमरू वादकांचं पथक या यात्रेत सहभागी झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फुलांनी सजवलेल्या वाहनावर आरूढ होत यात्रेचं नेतृत्व केलं.

**<><><><><>**

विद्यमान आर्थिक वर्षात, देशाची वित्तीय तूट स्थूल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यापर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असल्याचं, पीडब्ल्यूसी या पतमानांकन संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. ही तूट यापेक्षाही कमी राहील, आणि यामुळे आर्थिक व्यवस्थापनातली भारताची मजबूत स्थिती जागतिक पातळीवर अधोरेखित होत असल्याचं, या संस्थेचे प्रतिनिधी राणेन बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारताला एक आत्मविश्वासपूर्ण, महत्त्वाकांक्षी आणि स्वावलंबी राष्ट्र बनवण्याचं स्वप्न पाहत आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी प्रत्येक राज्यानं आपल्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करणं आवश्यक आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितलं. केरळात तिरुवनंतपुरम इथे, 'न्यू इंडिया, न्यू केरळ' या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. शाह यांनी यावेळी केरळच्या आयुर्वेद, माहिती तंत्रज्ञान, पर्यटन

आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचं कौतुक केलं. या दौऱ्यात त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित प्रतिनिधींची भेट घेऊन चर्चा केली.

**<><><><>**

जर्मनीचे चॅन्सेलर फ्रीड्रीच मर्झ उद्यापासून २ दिवसांच्या भारत भेटीवर येत असून, हा त्यांचा पहिलाच अधिकृत भारत दाैरा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अहमदाबाद इथे त्यांचं स्वागत करतील.

उभय नेत्यांमध्ये संरक्षण-व्यापार-तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास या क्षेत्रांतील धोरणात्मक भागीदारीवर चर्चा होईल. मर्झ, साबरमती आश्रम आणि बंगळुरू इथल्या बाॅश या संकुलालाही भेट देणार असून, हा दौरा द्विपक्षीय संबंधांना नवी दिशा देणारा ठरेल, असं परराष्ट्र विभागानं म्हटलं आहे.

**<><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत लाल बहादूर शास्त्री यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त आज उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीभवनात त्यांना पुष्पांजली अर्पण केली. लाल बहादूर शास्त्री  यांचं जीवन साधेपणा, सचोटी आणि देशाप्रती असलेल्या अढळ निष्ठेचं प्रतीक आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

उद्या राष्ट्रीय युवा दिन आहे. स्वामी विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या या दिवशी विकसित भारत युवा नेतृत्व संवादात सहभागी होणार आहेत. यावेळी ते देशभरातून आलेल्या सुमारे तीन हजार तरुणांशी, तसंच आंतरराष्ट्रीय समुदायांच्या युवा प्रतिनिधींशी संवाद साधतील. भारताचा विकासाचा प्राधान्यक्रम आणि देश उभारणीची ध्येयं या विषयावर युवा सहभागींनी लिहिलेल्या निबंध संग्रहाचं प्रकाशनही यावेळी मोदी

यांच्या हस्ते होईल. युवा प्रतिनिधींमधल्या निवडक सहभागींना प्रधानमंत्र्यांसमोर त्यांच्या कल्पनांचं सादरीकरण करायची संधीही मिळणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. प्रचार संपण्यासाठी केवळ तीनच दिवस राहिले असून विविध पक्षांनी प्रचारात जोर लावला आहे. जाहीर  सभा, रोड शो, तसंच समाज माध्यमांवरदेखील प्रचाराला रंग चढला आहे. मतदानाच्या आधीचा रविवार असल्यानं आज अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवार करत आहेत.

मुंबई महापालिका निवडणूकीसाठीचा महायुतीचा वचननामा आज मुंबईत प्रकाशित करण्यात आला. यानिमित्त आयोजित वार्ताहर परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले उपस्थित होते. कचरामुक्त मुंबईसह मुंबईचा पाणी प्रश्न मिटवून मिठी नदी स्वच्छ करण्याचं काम केलं जाईल असं मुख्यमंत्री फडनवीस यांनी यावेळी सांगितलं….

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री (२४ सेकंद)**

मुंबईत राहणारा मराठी माणूस बाहेर जणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी, बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी निमित्त वैद्यकीय विद्यापीठ तयार करु, तसंच लघु उद्योजकांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं सांगितलं.

नागपूर महानगरपालिकेसाठी भाजपानं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. नागपूर जागतिक दर्जाचं शहर बनवण्यासाठी ई- लायब्ररी, ४ स्तरीय वाहतूक, स्कायबस सुविधा, आणि विविध ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचं आश्वासन जाहीरनाम्यात दिलं आहे.

मुख्यमंत्र्यांनी आज नाशिकमधे प्रचारसभा घेतली. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधे तीस हजार कोटी रुपयांची कामं केली जाणार असून नाशिकच्या भविष्याचा विचार करून विकास केला जाईल, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या यंदाच्या हंगामाचा प्रारंभ करणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत, आज वडोदरा इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात, न्यूझीलंडनं भारतापुढं विजयासाठी ३०१ धावांचं आव्हान ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. न्यूझीलंडनं निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३०० धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ३५ षटकात २ बाद २१४ धावा झाल्या होत्या. शुभमन गिल आणि विराट कोहली यांनी दुसऱ्या गड्यासाठी ११८ धावांची भागिदारी केली.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात जायंट्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होत आहे. नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात दिल्लीनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा गुजरातच्या ८ षटकांमध्ये बिनबाद ९४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

येत्या १४ जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या तिन्ही सेवादलांच्या सेवनिवृत्त जवानांच्या सन्मान दिनानिमित्त या अधिकाऱ्यांच्या विशेष संचलनाचं आयोजन आज मुंबईत मरीन ड्राईव्ह इथं करण्यात आलं होतं. या संचलनात निवृत्त अधिकाऱ्यांसह नौदलाचे कॅडेट्स, एनसीसी कॅडेट्स यांनीही सहभाग घेतला होता.

भारतीय सैन्य दलाचे पहिले फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांच्या निवृत्तीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

**<><><><><>**

जनता दलाचे माजी आमदार आणि ज्येष्ठ समाजवादी नेते गंगाधर पटणे यांचं आज नांदेड इथे वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. पटणे १९९८ ते २००४ या कालावधीत विधानपरिषदेचे माजी सदस्य होते. १९७४ ते १९८१ या काळात ते बिलोली नगरपरिषदेचे नगराध्यक्ष होते.

साने गुरुजी आणि  महात्मा बसवेश्वर यांच्यावर निष्ठा असलेले, ग्रंथालय चळवळीचा आधारस्तंभ, शिक्षणप्रेमी नेते अशी त्यांची ओळख होती. पटणे यांनी देहदानाचा संकल्प केला होता.  त्यांचं पार्थिव श्री गुरुगोविंद सिंघजी वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**